**शासन निर्णय क्र. वृकमा २०१२/प्र.क्र.११७/सां.का.४, दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१४ चे**

**परिशिष्ट - १**

**(वृद्ध साहित्यिक व कलाकार यांना मानधन योजनेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना)**

**प्रति,**

**अ) मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून इतर जिल्ह्यांसाठी**
**१. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद किंवा**
**२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किंवा**

**ब) मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयांसाठी**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**

| वृद्ध साहित्यिक / कलावंत पती / पत्नीचा एकत्रित पासपोर्ट आकाराचा फोटो (सक्षम अधिकाऱ्याने सांक्षांकित केलेला) |
|---|

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव | |
| २ | पत्ता | |
| ३ | अर्जदाराचा बँक खाते क्रमांक व बँकेचा IFSC कोड क्रमांक (त्याच्या साक्षांकित प्रतीसह) | |
| ४ | जन्मतारीख व अर्जाच्या दिनांकाच्या दिवशीचे वय | |
| ५ | **जन्मतारखेचा दाखला** (ग्रामपंचायत / नगर पंचायत / नगरपरिषद / महानगर पालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा युआयडी प्रमाणपत्र किंवा ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला वयाचा दाखला यापैकी एक दाखला) | |
| ६ | अर्जदाराच्या पत्नीचे / पतीचे नाव | |
| ७ | **महाराष्ट्रातील रहिवाशी असल्याचा दाखला** (ग्रामपंचायत / नगर पंचायत / नगर परिषद / महानगर पालिका यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी रहिवाशी असल्याबाबतचा दिलेला दाखला सादर करण्यात यावा) | |
| ८ | कुटुंबातील व्यक्तीची संख्या | |
| ९ | साहित्यिक / कलावंत यांच्यावर अवलंबून असलेल्या इतर व्यक्तींची संख्या (व्यक्तींची नावे, नाते, वय, व्यवसाय याची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी.) | |
| १० | तहसिलदार याने दिलेला कलाकाराच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला | |
| ११ | अर्जदार अर्धांगवायू/क्षय/कर्करोग किंवा कुष्टरोग या रोगांनी आजारी आहे का अथवा, शारिरीक व्यंग किंवा अपघाताने अपंगत्व आले आहे काय? | |
| १२ | असल्यास रोगाबाबत / अपंगत्वाबाबत जिल्हा शल्य | |

| | | |
|---|---|---|
| १३ | धर्म व जातीचा प्रवर्ग | |
| १४ | साहित्याचा / कलेचा प्रकार | |
| १५ | साहित्य / कलेच्या क्षेत्रात किती वर्षापासून कार्यरत आहेत | |
| १६ | साहित्यिक यांचे प्रकाशित झालेल्या साहित्याची सविस्तर माहिती (स्वतंत्र कागदावर माहिती द्यावी). | |
| १७ | कलाकार यांनी सादर केलेल्या कलेची सविस्तर माहिती व ठिकाणे (स्वतंत्र कागदावर माहिती द्यावी). | |
| १८ | अर्जासोबत साहित्य / कलाक्षेत्रातील कार्याचे पुरावे. अ) प्रकाशित साहित्य / लेखनाची कात्रणे / कलावंतांच्या कार्यक्रमांची छायाचित्रे / वृत्तपत्रिय बातम्या / जाहिराती /आकाशवाणी अथवा दुरदर्शवरील कार्यक्रमाचे पुरावे / निमंत्रण पत्रिका / प्राप्त प्रशस्ती पत्रकांची माहिती ज्यात अर्जदाराचा उल्लेख आहे अशा शासकीय अभिलेखाची सांक्षांकित प्रत | |
| | ब) केंद्र शासनाचा / राज्य शासनाचा / सांस्कृतिक मंत्रालयाच्या पुरस्काराचे प्रमाणपत्र. | |
| | क) केंद्र / राज्य शासनाच्या साहित्य अकादमी / संगीत नाटक अकादमी / राज्य शासनाचे साहित्य व सांस्कृतिक विषयक पुरस्कार / पश्चिम क्षेत्र किंवा दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र / सांस्कृतिक कार्य संचालनालय / आकाशवाणी / दुरदर्शन / साहित्य अकादमी यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातील सहभागाचे पुरावे. | |
| | ड) जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित केलेल्या वाङ्मय विषयक अथवा कला विषय नोंदणीकृत सांस्कृतिक संस्थांचे शिफारसपत्र जोडावे. | |
| | इ) नामांकित संस्था / व्यक्तीचे शिफारस पत्र | |
| १९ | शासनाच्या अन्य योजनेचा लाभ मिळतो काय ? | |
| | अ) असल्यास, कोणत्या योजनेचा व किती रक्कम मिळते. | |
| | ब) नसल्यास, इतर शासकीय योजनांचा लाभ घेत नसल्या बाबतचे नोटरी केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत | |
| २० | मी असे जाहिर करतो / करते की, मी वर दिलेली माहिती सत्य व बिनचूक असून सदरची माहिती चुकीची आढळल्यास माझ्या विरुद्ध फौजदारी कारवाईसह इतर कारवाई करण्यांस मी पात्र असल्याची मला जाणीव आहे. | |
| | स्थळ :- | |
| | दिनांक :- | |
| | अर्जदाराची सही आणि उजव्या किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा | |

टिप :- १) अर्जदाराने सही करणे किंवा अंगठ्याचा ठसा देणे बंधनकारक आहे

**शासन निर्णय क्र. वृकमा २०१२/प्र.क्र.११७/सां.का.४, दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१४ चे**
**परिशिष्ट - २**

## वृद्ध साहित्यिक व वृद्ध कलाकार मानधन योजना पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | **रहिवाशी प्रमाणपत्र -** अर्जदार किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे. |
| २ | **वय -** स्त्री / पुरुष - वृद्ध साहित्यीक व कलाकार यांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त असावे. |
| ३ | **अपंगत्व / रोगाबाबत वयाची अट -** जे साहित्यिक व कलावंत अर्धांगवायू, क्षय, कर्करोग, कुष्टरोग इ. रोगांनी आजारी असतील व ज्यांना ४०% शारिरिक व्यंग असेल किंवा अपघाताने ४०% अंपगत्व आले असेल व त्यामुळ ते स्वत:चा व्यवसाय करु शकत नसतील, असे साहित्यिक व कलावंत यांच्यासाठी वयाची अट शिथिल करण्यात येईल. |
| ४ | **उत्पन्न -** कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ४८,०००/- पेक्षा जास्त नसावे. |
| ५ | **कलाक्षेत्र -** या योजनेअंतर्गत अमूक एका कलाप्रकाराचा समावेश होईल किंवा कसे, याबाबत अनेकवेळा जिल्हा स्तरावरुन शासनाकडे मार्गदर्शन मागण्यात येते. या अनुषंगाने याठिकाणी असे स्पष्टपणे नमूद करण्यात येते की, कला हे क्षेत्र अत्यंत व्यापक असून या योजनेच्या अंतर्गत पात्र कलाप्रकारांची सुचीबद्ध यादी तयार करुन ओंजळभर कलाप्रकारांसाठीच ही योजना बंदिस्त करणे चुकीचे असल्यामुळे याठिकाणी कलाप्रकारांची यादी बनवून मर्यादित कलाप्रकारांसाठीच मानधन योजना मर्यादित ठेवणे हे योग्य नसल्यामुळे याप्रकरणी कलाप्रकारांची यादी तयार न करता या योजनेअंतर्गत सर्व कला प्रकारांचा मानधन योजनेअंतर्गत अंतर्भाव करण्यात येत आहे. |
| ६ | **पात्रतेची अर्हता :-** साहित्य क्षेत्रात किंवा कलेच्या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली आहे तसेच कला आणि वाङ्.मय क्षेत्रात ज्यांनी किमान १५ ते २० वर्षे इतक्या प्रदीर्घ काळासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे असे वृद्ध साहित्यिक / कलावंत थोडक्यात ज्यांनी साहित्य किंवा कलेसाठी आपले आयुष्य वेचले आहे व यावरच ज्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होता असे मान्यवर. |
| ७ | **कार्याचे पुरावे :-** साहित्यक / कलावंत असल्याबाबत तसेच या क्षेत्रात १५ ते २० वर्षे इतका प्रदीर्घ काळ कार्य केल्याबाबतचे परिशिष्ट-१ मधील अ.क्र. १६ मधील अ ते इ या पुराव्यांपैकी किमान दोन पुरावे सादर करावेत. |
| ८ | **हयातीचा दाखला :-** प्रत्येक आर्थिक वर्षी मानधनाची रक्कम अदा करण्यापूर्वी संबंधित मान्यवर हयात असल्याबद्दलचा दाखला त्यांच्याकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. |
| ९ | **इतर शासकीय योजनांचा लाभ :-** शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेणारी व्यक्ती या मानधन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |